# सेवक वार्ता

मार्च -२०२३

वर्ष -४, अंक-५

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, गोखले नगर, पुणे - ४११०१६


## नुतन अध्यक्ष श्री. विश्वास सावरकर यांचेकडून....

## सेवकसाठी काही विचार



सेवकच्या संस्थापनेपासून तिच्यातील काही विद्वान वन अधिकाऱ्यांनी त्यांची दूरदृष्टी आणि व्यावसायिक कुशाग्र बुद्धीने सेवकचे प्रभावीपणे नेतृत्व केले आहे व त्यास सेवक सभासदांचा उत्तम परीसाद लाभला आहे. संस्थेची खासियत आहे की, संस्थेकडे वने व वन्यजीव शास्त्रे, त्यांचा क्षेत्रीय अभ्यास व व्यावसायिक तत्वांशी तडजोड न करता वास्तवतेवर पकड असणारे मोठे अनुभवी असे अनेक सदस्य आहेत. जानेवारी २०२३ मध्ये अमरावती येथे झालेल्या सर्वसाधारण सभेत माझी अध्यक्षपदी निवड झाली, या सन्मानाप्रित्यर्थ मी मनापासून कृतज्ञ आहे. तो विश्वास पूर्ण करण्यासाठी मी नक्कीच माझ्या परीने प्रयत्न करेन. सेवकने वन विभागासह, वन विकास महामंडळ आणि सामाजिक वनीकरण विभाग या शाखांमध्ये विज्ञाननिष्ठीत अभ्यासाने, व्यावसायिक ज्ञानाधारीत सहाय्यता केली आहे. सेवकच्या कार्याची उत्तम ओळख झाली आहेच आणि त्यातून हे निश्चित आहे की सेवकला अशा मदतीचा हात देण्याची संधी पुढे येत राहील. आपण अशा संधींचा पाठपुरावा करणे तसेच वनविभागातून निवृत्त झालेल्यांचा, विशेषत: जे विविध विषयांतील तज्ञ म्हणून ओळखले जातात, अशा अधिकाऱ्यांची माहिती वेळोवेळी घेत रहाणे आवश्यक आहे. अशा अधिका-यांना सेवकमध्ये सदस्य म्हणून सामील होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. त्यामुळे संघ मजबूत होण्यास मदत होईल.

सेवक संस्थेत स्वतांतर्गत तज्ञांचा गट तयार करण्याचा आपण विचार करू शकतो. विविध 'विकास' प्रकल्पांमुळे जंगलांचे वाढते तुकडे होत असल्याने, वनक्षेत्रासाठी व वन्य प्राण्यांसाठी हा अतिशय कठीण काळ आहे. विविध शमनकारी उपायांची मागणीही होत आहे. इकोटूरिझमच्या नावाखाली विस्तृत स्वरूपात वन भ्रमंती पर्यटन फोफावत आहे, जे अत्यंत नुकसानकारक आहे. यातील तथ्ये शोधणे आणि ह्या ना त्या अशा अनेक हानीकारक प्रकरणांबद्दल माहिती संकलित करणे व जरूर तेंव्हा त्यावर लिखाण करणे अथवा योग्य दिशा दाखवणे अगदी रास्त होईल. अशा बौध्दिक संकलिताचा विश्वासार्ह वापर सुधारात्मक दिशानिर्देश सुचवण्यासाठी सेवक वापरू शकतो. उद्धृत केलेल्या उदाहरणांव्यतिरिक्त, सदस्य सेवकाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी आणि व्यापक अर्थाने वन विभागाची भूमिका मजबूत करण्यासाठी विज्ञान आणि वनक्षेत्रातील कारवाई ह्यांचा मेळ असणाऱ्या अभ्यासाचा व त्या योगे नवीन कल्पनांचा योग्य वापर कसा करता येईल याबाबत सेवक योगदान देऊ शकतो. उदाहरणार्थ, गवताळ प्रदेश मोठ्या प्रमाणावर पडीक जमीन म्हणून सूचीबद्ध आहेत. अशां क्षेत्रांची ती महत्त्वाची परिसंस्था आहेत म्हणून त्यांची उपस्थिती प्रस्थापित करण्यासाठी आपल्याला मजबूत युक्तिवादाची आवश्यकता आहे. अपेक्षेप्रमाणे, यापैकी काही उदाहरणे स्थळ विशिष्ट असतील, पण त्यासून मिळवलेले ज्ञान अशा इतर क्षेत्रांसाठी उपयुक्त ठरेल हे नक्कीच. स्थानिक नागरिकांच्या हितासाठी राबविलेल्या शासकीय योजनांचा जंगलांवरचा दबाव कमी करण्यासाठी सर्वोत्तम वापर कसा करता येईल हा सेवक साठी महत्त्वाचा विषय आहे. इकोडेव्हलपमेंट ही संकल्पना यात केंद्रस्थानी आहे

वनामध्ये रहाणाऱ्या व वनांना लागून असणाऱ्या वस्तींमध्ये स्थित असणाऱ्या नागरिकांच्या उपजीवीकतेसाठी लाभदायक व पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य असणाऱ्या उपक्रमांसाठी कंपन्यांचे सामाजिक दायित्व निधीचा (CSR) लाभ घेण्याचा मार्ग मोकळा आहे. त्यासाठी अशा उपक्रमांना उद्देशून सुयोग्य असे विचार सेवक संस्था मांडू शकते. त्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करणे उचित ठरेल. वन विभाग स्थानिक जनसमुदायांची काळजी घेतो; हे सार्वजनिकपणे स्पष्ट करण्याची खास गरज आहे. चुकीच्या कारणास्तव वन विभागाबद्दल वाईट प्रसिद्धी अनेक वेळा केली जाते ह्याची अशा उपाय योजनांनी खंडन करणे शक्य होईल. वन विकास महामंडळ आणि सामाजिक वनीकरणामध्ये विविध व्यवस्थापन समस्या आहेत; ज्याचा काही सेवक सदस्यांना अनुभव आला असेल. त्यांचे कार्य इकोसिस्टीम संवर्धनास अनुकूल कसे बनवता येईल हा एक मोठा विषय असू शकतो. कार्य आयोजना अहवाल इकोसिस्टम केंद्रिभूत

करून कसा विकसित होऊ शकतो, हा आणखी एक महत्वाचा विषय आहे. वन्यजीव व्यवस्थापन योजनांमधील जरूर ती सुधारणा साध्य करणे व प्रशिक्षणाच्या व संशोधन क्षेत्रांत नवीन दिशानिर्देश सुचविणे हे सेवकसाठी उत्तम विषय आहेत. वन क्षेत्राला लागू होणारे विविध कायदे, त्यांच्यामुळे वने व वन्य प्राण्यांच्या हितासाठी अनुपयुक्त होत असलेले बदल, वन्यजीवांची तस्करी व त्यावरील उपाय, आणि वनांतील गौण उत्पादनांचा होणारा व्यापार जेणेकरून वनांचे रक्षण, संवर्धन व स्थानिक नागरिकांचा फायदा ह्यांचा मेळ साध्य करण्याची दिशा निश्चित करणे ही काळाची गरज आहे. नद्या, नाले, इतर श्रोत, समुद्र किना-यांचे आणि सागरी परिसंस्था ह्यांचे संरक्षण व त्यांच्या वापराचे संतुलन साधण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान इत्यादी अशा अनेक महत्वांच्या विषयांची यादी मोठी आहे. सेवक सदस्य जरूर त्या विषयांच्या याद्या सुचवू शकतात व अशा ज्ञानात भर टाकून सहभागी होऊ शकतात. सेवकने अशा विषयांचे ज्ञान सदस्यांच्या अनुभवानुसार एकत्रित करून अशा विचार गटाची स्थापना केली तर सेवकच्या भविष्य काळातील कार्यासाठी अशी ज्ञानगंगा नक्कीच उपयोगी ठरेल. ह्याची रूपरेषा/रचना कशी करावी ह्याबाबत आपण विचार विनिमय करू शकतो.

## सा.व. विभाग कामांचे मुल्यांकन यशस्वीरित्या पूर्ण

म. ग्रा. रो. ह. यो. द्वारा सामाजिक वनीकरण यंत्रणेने केलेल्या गट लागवड आणि बांधावरील लागवडडीच्या मूल्यांकनासाठी दरपत्रके स्वीकृत होवून सेवक संघास मिळाले होते. ते यशस्वीरित्या पूर्ण करण्याम आले. त्याचा गोषवारा ...

| विभाग | लाभार्थी | क्षेत्र हे. | रोपे |
|---|---|---|---|
| रत्नागिरी | ३९ | २५.८२ | १२,५०० |
| सिंधुदुर्ग | २६ | २८.१० | ८,१२५ |
| परभणी | ५० | ४७.२२ | ४८,२०० |
| जालना | ४९ | ४६.५३ | २८,७२५ |
| एकूण | १६४ | १४७.६७ | ९७,५५० |

मूल्यांकनात खालील सदस्यांनी सहभाग घेतला होता. सर्वश्री. पी.के.कुलकर्णी, पी.ए. सुतळे, जी. के. निकम, बी. आर. छल्लारे. आर. टी. मोरे, एस. के. गवळी, पी. एच. वाघ. आर. जी. राणे, एस. जी. पुराणिक.

या मूल्यांकन कामी श्री. पत्की प्रकल्प समन्वयक होते. श्री अस्थाना या मूल्यांकन प्रकल्पाचे चमू प्रमुख म्हणून काम केले.

## पाणलोट क्षेत्र उपचार अंतर्गत मूल्यांकन कामाचा प्रारूप अहवाल सादर.

राज्यातील धुळे, ठाणे व नागपूर वनवृत्तातील पाणलोट क्षेत्र उपचार अंतर्गत - ६२९ हे. रोपवने २८ स्थळे, सामाजिक वनीकरण विभाग रस्ता दुतर्फा रोपवने -५२५ किमी. १७४ स्थळे , मृद-जल संधारण कामे - ९९ चे मूल्यांकन काम श्री. पत्की यांच्या देखरेखीत वेळेआधी पूर्ण झाले .

त्या मूल्यांकन कामाचा प्रारूप अहवाल समन्वयक श्री. पत्की सर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री एस. के. गवळी, तयार करून प्रमुवसं व मुकाअ (महा-कॅम्पा) नागपूर यांना मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. याकामी एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग इंस्टीट्यूट, पुणे यांचेव्दारा विकसित केलेली संगणकीय प्रणालीचा वापर करणेत आला. मुल्यांकन कामाची माहितीचे ऑनलाईन संकलन, तसेच संगणकीय प्रणालीव्दारा केलेल्या पृथ्वकरणांती निष्कर्ष काढण्यात येवून प्रारूप मुल्यांकन अहवाल लेखन करण्यात आले.

### *प्रासंगिक..*

संपूर्ण जगभरात 3 मार्च रोजी, UN म्हणजेच संयुक्त राष्ट्राने निर्धारीत केले प्रमाणे जागतीक वन्यजीव दिन साजरा केला जातो.
संयुक्त राष्ट्रामधे 1973 मध्ये स्वाक्षरी केलेल्या "वन्य जीवजंतू आणि वनस्पतींच्या लुप्तप्राय प्रजातींसाठी" आंतरराष्ट्रीय व्यापारावरील अधिवेशन CITES चा वाढदिवस असल्याने ही तारीख निवडण्यात आली. हा CITES (Convention on International Trade in Endangered Species of Wild Fauna and Flora) चा सुध्दा 50 वा वाढदिवस आहे.
वन्यजीव संवर्धनासाठी आपले सर्वांचे प्रयत्न एकत्र येऊन अजुन मोठ्या प्रमाणात व्हावेत आणि वन्यजीव सृष्टी आणि पर्यायाने आपल्या पुढच्या पिढ्या वाचविण्यासाठी आपले योगदान वाढविण्यासाठी आपल्या सेवक संघाचे प्रयत्न आहेत.




## निधन वार्ता

श्री. शाम देशपांडे यांचे अमरावती येथे हृदयविकाराच्या झटक्याने दि. २६ फेब्रुवारी २३ रोजी निधन झाले. त्यांना सेवक परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली. त्यांच्या आत्म्यास सद्गती प्राप्त होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना

🌻 श्री. वसंत जोशी यांचेकडून ...

मी पुण्यातल्या ज्या पलाश मेडीकेअर सेंटरमधे जरुरीनुसार बऱ्याचदा येऊन राहतो, तेथे मी त्रयस्थ दृष्टीने अनुभवत असलेले काही प्रसंग.

इथे मी जशा पाहतो,
व्यथा त्या वृद्धांच्या
निस्तेज चेहऱ्याच्या,
शुन्यातल्या नजरेच्या,
काष्टवत देहांच्या.
तशाच कृतीही पाहतो
पक्षघात पीडितांच्या
आनंदी वृत्तीच्या,
अन निर्धाराने टाकलेल्या
पावलांच्या.
इथे मी जशा ऐकतो,
किंकाळ्या वेदनांच्या,
हाका मदतीच्या.
तशीच कधी ऐकतो
नव्वदीच्या डॉक्टरची,
गोष्ट आयुष्याची.
पण मी हेवा करतो
आपल्या भाग्याचा,
पलाश उपलब्धिचा,
येथील तत्पर सेवेचा,
योग अभ्यासाचा.
मी इथे जोपासतो
छंद माझा स्वत:चा आवडीचा,
संत साहित्य इंग्लिश अनुवादाचा.
इथे नसते उणीव कधी सुविधांची,
वैद्यकीय मदतीची, चिंता कशाची
लाभे इथे शांती अन समाधान
मनाचे साक्षी अनुवादलेल्या
बाराशे पृष्टांच्या,
डॉ. पंडितांच्या आग्रहामुळे
सततच्या.
करायचे अभंग बाराशे अनुवादीत,
व्रत चालायचे जोवर जीव जीवात,
सतत ठेवतसे बुद्धी व्यग्र कामात,
जसा खाउन लाडू पुन्हा उरे हातात.




## चिमणी संरक्षण संवर्धन मानवी जिवनास अवश्यक

दि.२० रोजी जागतिक चिमणी दिनानिमित्त जागतिक चिमणी दिन साजरा करण्यात आला. यावेळी मंचावर ऊपस्थित श्री.पी. एच. वाघ, माजी अध्यक्ष, सेवक संघ, धुळे शाखा, श्री. डि. आर. अडकिने, वनक्षेत्रपाल, पिंपळनेर, प्रा.डॉ.श्रीमती माळी, या होत्या यावेळी मा.प्राचार्य एस.टी. चौधरी यांनी पशुपक्षी बद्दल माहिती विषद केली. तसेच श्री. पी. एच. वाघ. यांनी चिमणी या पक्षाबद्दल पर्यावरणीय घटक व चिमणी वाचविणे किती महत्वाचे आहे त्याबाबत माहिती दिली. श्री.अडकिने, यांनी चिमणीचे संवर्धन, संरक्षण अवश्यकता, तसेच २० मार्च जागतिक चिमणी दिन, २१ मार्च जागतिक वनदिन, दि. २२ मार्च जागतिक जलदिन आणि दि.२३ मार्च जागतिक हवामान दिन या बाबतीत सखोल मार्गदर्शन केले. प्रा.जाधव यांनी चिमणीचे आयुष्य खाद्य, जीवन प्रक्रिया, चिमणीचे प्रकार, अनेक प्रांतातील नावे याबाबत माहिती दिली. त्यावेळी कार्यक्रमात पर्यावरण मित्र बहु ऊददेशीय संस्था नाशिक, विभागीय अध्यक्ष गोकुळ देवरे धुळे तर्फे चिमण्यांना पाणी पिण्यासाठी पाण्याचे मातीचे भांडे (वाडगे) प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. तसेच वन्यजीव रक्षक पिंपळनेर यांचेकडुन चिमणीचे बहुऊपयोगी पत्र्याचे घरटे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वनक्षेत्रातील वन कर्मचारी, वनपाल कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी, ग्रामस्थ वन्य पशु पक्षी प्रेमी ऊपस्थित होते.




वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे।
वृक्ष देवो भव॥
२१ मार्च, जागतिक वन दिनाच्या निमित्ताने वाचकांना हार्दिक शुभेच्छा

**अमरावती येथे जागतिक वन दीन कार्यक्रमात सेवक संघ, सायकल व पायी भ्रमण.**







चैत्र शुध्द प्रतिपदा,
गुढीपाडव्याच्या सर्व सदस्यांना आणि कुटुंबियांना हार्दिक शुभेच्छा हे नवीन वर्ष सुखाचे, समृद्धीचे, आणि भरभराटीचे जावो !

ॐ ब्रह्मध्वज नमस्तेऽस्तु सर्वाभीष्ट फलप्रद !
प्राप्तेऽस्मिन्वत्सरे नित्यं मद्‌गृहे मंगलं कुरू !!
। । ब्रह्मध्वजाय नम:।।
हिंदू नुतनवर्षाभिनंदन !




**मग्रारोहयो मुल्यांकनाचे मानधन वाटपास अध्यक्षांची मंजुरी**

क्रुषिवानिकी कार्यक्रमा अंर्तगत,मग्रारोह.योजने द्वारा सा.व.वि.ने व्रुक्ष लागवड केलेल्या १६४ स्थळांचे मूल्यांकन सेवकने केले असून,त्यात पुढील ११ व्यक्तींचा सहभाग होता . सर्व श्री. एस.के.गवळी, आर.जी.राणे, पी. एच.वाघ, जी.के.निकम,बी.आर. छल्लारे, पी.ए.सुतळे, एस.जी. पुराणीक, पी.के.कुलकर्णी, आर.टी.मोरे, शिरीष अस्थाना, Envision Computer Training Institute, Pune.
प्रत्येकी रु.वीस हजार मानधन देण्याचे प्रस्तावित केले असता. कार्यकारी मंडळाने मंजूरी प्रदान केली आहे. अ.क्र.१ ते५ धुळे शाखेचे सदस्य आहेत म्हणून त्यांचे मानधनाची रक्कम रु.एक लाख धुळे शाखेमार्फत वाटप करणेसाठी ,धुळे शाखेस पाठवाणेत येईल.रकमेचे वाटप १-४-२०२३ नंतर करणेत येईल. एकूण मुल्यांकन शुल्क रु.३,३८,८२० अपेक्षित आहे. अहवाल तयार करणे/छापणे या करिता येणारा खर्च व सेवकचा नफा यासाठी इतर रक्कम राखून ठेवली आहे.

**अध्यात्मिक मार्गावर आपली प्रगती होत आहे, आपला आंतरिक विकास होत आहे हे ओळखण्याचे काही मार्ग:**

प्रा डॉ एल ए पाटील

१.आध्यात्मिक मार्गावर ( आध्यात्मिक मार्ग म्हणजे मनातले दोष दूर करणारा मार्ग) आपली प्रगती व्हावी अशी आंतरीक तीव्र इच्छशक्ती जागृत असल्याचे सतत दिसत असेल तर ...
२.आपल्या स्वतःच्या चुकांकडे आणि दोषांकडे आपण बघू लागलो व ते दूर करण्याचा प्रयत्न करू लागलो तर ...
३.दुसऱ्यांविषयी तक्रार करण्याचा आपला स्वभाव कमी होत चालला असेल तर...
४. दुसऱ्यांचे चांगले विचार व चांगल्या सवयी आपण आत्मसात करू लागलो तर...
५.विनाविषयभोगाने आपण अस्वस्थ होत नसू आणि स्वतःला स्वतःचा मित्र बनवून स्वस्थ ठेऊ शकत असलो तर..
६.माझ्या कालच्या आचरणात झालेल्या चुकांपेक्षा आज कमी चुका होतील याची सतत काळजी घेण्याचा स्वभाव बनला असेल तर...
७.एकांतात सुद्धा आपल्यामध्ये सात्विक व शुभविचार येत राहिले, एकांतात सुद्धा आपण आपल्या सवयी चांगल्या ठेवू शकत असलो, भ्रष्टाचाराची संधी असूनही भ्रष्टाचार करत नसलो तर..
८. जे आपल्याला चांगलं वाटत नाही ते दुसऱ्याला करायला भाग पाडत नसेल तर. खोटं बोलणं मला चांगलं वाटत नाही म्हणून मी दुसऱ्यालाही खोटं बोलायला भाग पाडत नसेल तर. स्वतः वाईट व्यवहार करत नाही आणि दुसऱ्यालाही वाईट व्यवहार करायला मी भाग पाडत नसेल तर.....
९. दुसऱ्यांची सेवा करण्यात, परोपकारात आवड व आनंद वाटू लागला तर ...
१०.आपल्यातले दोष दिसू लागले आणि निघू लागले तर, आपण गुण धारण करू लागलो आणि गुण आचरणात आणू लागलो तर, आपल्यातल्या वाईट सवयी दूर होऊ लागल्या तर,
११.आपण प्रज्ञावंत, करुणावंत व शीलवंत होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू लागलो तर..
१२.आतल्या जन्मदत्तनिष्ठा ( जात, पंथ, धर्म, उच्च नीच इत्यादी) निघत जाऊन आपण मूल्याधिष्ठित ( प्रामाणिक, परोपकारी, विवेकी, विज्ञान निष्ठ इत्यादी) होत जाण्याचा विवेक पूर्ण प्रयत्न करू लागलो तर ..
१३.आत्मपरीक्षण व आत्मनिरीक्षणाने मनातले दोष दूर करत, शुद्धचित्त धारण करण्याची स्वयंस्फूर्तीने साधना ( सतत प्रयत्न ) घट्ट लागली तर....
१४. मनात दुसऱ्यांबद्दल आदर व प्रेम वाढत जाऊन, आचरणात न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षता इत्यादी समाज मूल्ये दिसू लागली तर...
१५. धर्म व ईश्वर या मानव निर्मित कल्पनांनी कल्याण होणार नाही याची खात्री वाटत असेल तर..
१६. विज्ञानाने निर्माण केलेल्या भोगवादी संस्कृतीतून दुःख, अस्वस्थता निर्माण होत आहे हे मनापासुन पटले तर...
१७.अध्यात्मिक सामर्थ्याची कसोटी पाहणारा नैतिक व न्याय्य संघर्ष प्रत्यक्ष उभा करता आला तर..

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी